## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष

## निशाणी क्र. ०६ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | केतन रजेसिंग जाधव, |
| वय | – | ३६ वर्षे, |
| व्यवसाय | – | जवान. ब. क्र. १९, |
| सध्या नेमणुक | – | बिट क्र. २, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शिरपुर, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. घटना दि. १३.०४.२०२५ रोजीची आहे. त्यादिवशी मी जवान म्हणुन दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शिरपुर येथे कार्यरत होतो. त्यादिवशी दुय्यम निरीक्षक श्री. ए. सी. मानकर यांना गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली की, हॉटेल योगेश, विखरण शिवार, येथे एक इसम अवैधरित्या देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री करतो. त्यानुसार मे. साहेबांनी विखरण गावाजवळ दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना सदर बातमीची सविस्तर माहिती सांगुन पंच म्हणुन काम पाहण्याची विनंती केली. ते पंच म्हणुन येण्यास तयार झाले. त्यानंतर मिळालेल्या बातमीनुसार खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी जाऊन हॉटेल योगेश येथे आम्ही आमचे वाहन उभे केले.

०२. मिळालेल्या बातमीनुसारच्या हॉटेलमध्ये गेलो असता तेथे एक इसम हजर होता. सदर इसमास त्याला त्याचे नाव गाव विचारे असता त्याने त्याचे नाव रामचंद्र वामन पाटील, रा. विखरण, ता. शिंदखेडा, जि. धुळे असे सांगितले. त्यानंतर आम्ही हॉटेलची तपासणी केली असता एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु टँगो पंचच्या १८० मी. ली. मापाच्या ४५ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या. त्यावर मे. साहेबांनी सी.ए. तपासणी करीता देशी दारु टँगो पंचची त्यातील १८० मिली मापाची एक बाटली काढून साहेबांच्या व पंचांच्या सह्यांचे

लेबल लावून बाटली सिल बंद केली. तसेच नमुना सिल बंद बाटली व उर्वरित मुद्देमाल जप्त करुन तपासकामी ताब्यात घेतला. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्यामध्ये काहीही मौल्यवान वस्तु मिळुन आली नाही. त्यानंतर आरोपीस बीएनएसएस कलम ३५ प्रमाणे नोटीस देवुन सोडले. त्यानंतर कार्यालयात जावुन मी फिर्याद दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच फिर्याद आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर फिर्यादीस **नि. क्र. १०** देण्यात येते.) मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज व गैरहजेरीमध्ये काम चालविणेबाबत पुरसिस अनुक्रमे नि. क्र. ०८ व ०९ कडे दाखल आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. व्ही. तायडे यांचे मार्फत.</u>**

०३. मी सही करण्यापुर्वी फिर्याद वाचुन पाहिली होती. विखरण येथे योगेश हॉटेल एक नाश्ताची व एक जेवणाची असे आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, एका हॉटेलला लागुन योगेश टी हाऊस, योगेश ॲक्वा व योगेश पेट्रोल पंप असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर तिन्ही ठिकाणी लोकांची व गाडयांची ये जा असते. दुसरी योगेश हॉटेलच्या बाजुला कामाजी बाबा मंदिर मागच्या बाजुला रहिवासी वस्ती व समोर दोंडाईचा ते धुळे रस्ता आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, विखरण नंतर कामपुर व कामपुर नंतर मेथी येते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीत योगेश हॉटेल हे मेथी शिवारात नमुद केलेले आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, गुप्त बातमी किती वाजता मिळाली, किती वाजता आम्ही निघालो, किती वाजता पोचलो या बाबी फिर्यादीत नमुद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पंटर पाठवुन बातमीची खात्री केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नसल्याने फिर्यादीमध्ये आम्ही कधी निघालो व किती पोचलो हे नमुद

केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नमुन्या दाखल काढण्यात आलेल्या १८० मी. ली. मापाच्या बाटलीचा बॅच क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला छाप्याचे कामी पंचांची आवश्यकता भासते. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र याने आम्ही सांगितलेल्या कोऱ्या कागदांवर सहया केलया नाहीत म्हणुन आम्ही त्याच्याविरुध्द मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, ४५ सिलबंद बाटल्यांशी आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, अन्य गुन्हयातील ४५ बाटल्या आरोपीच्या माथी मारुन त्याच्याविरुध्द खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.01.21 16:18:41 +0530

दिनांक : २०/०१/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – जी. एस. अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – २१.०१.२०२६. |

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)